सकाळ

करिअर अपडेट

अंकित भार्गव



# डोमेन स्किल्स आणि २:२:२चा नियम



'कॅम्पस टू कॉर्पोरेट' हा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या 'आपल्या कंपनीला जाणून घ्या' या घटकाची आपण मागील लेखामध्ये माहिती घेतली. त्याचाच पुढचा भाग असणाऱ्या या लेखामध्ये 'डोमेन स्कील डेव्हलपमेंट' अर्थात कार्यक्षेत्राशी संबंधित कौशल्यांचे विकसन या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे.

## कौशल्य पातळी

संपूर्ण शिक्षणात सुरुवातीपासून तुम्हाला चांगले गुण मिळत आहेत. त्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रामध्येही उत्तम कामगिरी बजावू असे तुम्हाला वाटण्याची शक्यता आहे. परंतु गैरसमज ठरू शकतो. आपल्याकडे अभ्यासक्रम वेळच्या वेळी अद्ययावत केला जात नाही. त्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये सुरू असलेले काम आणि विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शिक्षण यामध्ये अंतर पडते. त्यामुळेच कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करणे महत्त्वाचे ठरते.

## मापदंड

कौशल्याची पातळी आणि कामाच्या अनुभवाची वर्षे यांच्यामध्ये गल्लत करू नका. आपण किती व्यावसायिकपणे/समजूतदारपणे काम करू शकतो (गुणवत्ता) हे आपल्या अनुभवांच्या वर्षांवरून दिसते. आपण किती कामे पूर्ण करू शकतो(संख्या) यावरून आपली कौशल्य पातळी समजून येते. तुम्ही अभियंता असाल किंवा डेटा ॲनालीस्ट तुमच्या १० कौशल्य पातळ्यांचे मूल्यमापन होते.

## गॅप आयडेंटिफिकेशन

कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये तुमचा प्रवेश झाल्यानंतर, आपली प्रगतीची आकांक्षा आणि कौशल्य पातळी यामध्ये असलेले अंतर समजून घेऊन तत्काळ त्याची नोंद करून ठेवा. एकदा तुम्ही या बाबी नोंदवून ठेवल्या की, आपल्याला कोणती कामे करता येत नाहीत याची यादी तुमच्याकडे तयार होईल. हे कौशल्य विकसनाशी संबंधित अंतर भरून काढताना थोडा व्यापक विचार करा.

## भविष्यवेधी नियोजन

सर्व कौशल्ये एका दिवसात शिकणे शक्य नाही. आपल्या कौशल्य विकसनाचा मार्ग निश्चित करून तो अधिक वेगाने पूर्ण करणे श्रेयस्कर ठरते. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये 'चमकता तारा' बनण्यासाठी, तुम्हाला सहकाऱ्यांपेक्षा जास्त कौशल्ये अधिक वेगाने शिकून घ्यावी लागतील. ती शिकण्यासाठी अनेक कोर्स उपलब्ध असतात किंवा आपल्या तज्ज्ञ वरिष्ठांकडून शिकता येतात.

## कौशल्यांची सांगड

तुम्हाला काम करायचे आहे त्या भूमिकेसाठी कौशल्ये विकसित करा. तुम्हाला व्यवस्थापक व्हायचे असल्यास त्यासाठी नियोजनाशी संबंधित काही महत्त्वाची कौशल्ये शिकणे गरजेचे आहे. कार्यक्षेत्राशी संबंधित एखादी विशिष्ट मोठी भूमिका निभविण्याची इच्छा असल्यास संबंधित क्षेत्रातील अद्ययावत माहिती असणे, तसे संशोधन करणे आवश्यक आहे.

नेहमीच २:२:२ या नियमाचे पालन करा. तुम्ही आजपासून पुढील दोन वर्षांमध्ये स्वत:ला कुठे पाहू इच्छिता याकडे पहिला '२' हा आकडा निर्देश करतो. त्यासाठी आवश्यक असणारी नवीन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी दररोज २ तास दिले पाहिजेत याकडे दुसरा '२' हा आकडा निर्देश करतो. ही कौशल्ये असलेल्या किंवा ती आत्मसात करण्यासाठी प्रयत्नरत असणाऱ्या २ व्यक्तींच्या संपर्कात राहणे याकडे शेवटचा २ हा आकडा निर्देश करतो. करिअर घडवण्यासाठी प्रयत्न करा!

**(लेखक 'फॉक्सबेरी टेक्नॉलॉजीज'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.)**

Kolhapur, Main
10/05/2023 Page No. 8